उषाताई - एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व

उषाताई म्हणजे आमचे परमप्रिय गाडगीळ सर यांच्या पत्नी. माझ्या BE च्या शेवटच्या वर्षी Biomedical Symposium चे काम करण्यासाठी आम्ही विद्यार्थी लोक सरांच्या घरी -- म्हणजे "नगरकर वाड्यात" -- जाऊ लागलो. तेव्हा सर्वप्रथम उषाताईंची ओळख झाली. गाडगीळ सर मुळात विद्वान प्रोफेसर व शिवाय गंभीर प्रकृतीचे असल्याने त्यांच्या घरीही अगदी एखाद्या विद्यापीठासारखे गंभीर वातावरण असेल असा माझा कयास होता. प्रथमदर्शनी हा नगरकर वाडादेखील त्यातल्या असंख्य खोल्या, गल्लीबोळ, जिने यांमुळे रहस्यमय व गाडगीळ सरांसारखाच विद्वत्तापूर्ण वाटला. आम्ही वरच्या मजल्यावर जाऊन गपचूप, फारतर हळू आवाजात कुजबुजत काम सुरू केले. पण थोड्या वेळाने अचानक उषाताईंचे खळखळून हसणे कानावर पडले आणि मनावरचे सगळे दडपण एकदम कड्यावरून कोसळल्यासारखे धाडकन नाहीसे झाले. बराच वेळ वीज नसली आणि लाईट यावे तसा नगरकर वाडा एकदम चैतन्यमय झाला.

दडपण कमी झाल्यामुळे कामालाही वेग आला. आणि मग थोड्या वेळाने चक्क आम्हा सर्वांना "खाऊ" देखील आला. स्वतः उषाताईंनी बनवलेला, अस्सल मराठी खाऊ. मग तर आमचे सगळेच टेन्शन नाहीसे झाले. इतके की आपण गाडगीळ सरांच्या घरी आहोत, जरा पाचपोच ठेवून, अदबीने व्यवहार केला पाहिजे, जीभेवर ताबा (सर्वच दृष्टींनी) ठेवला पाहिजे, इत्यादी आधी ठरवलेले सर्व अनैसर्गिक निश्चय गळून पडले, आणि उरलेले काम हसत-खेळत, अगदी गल्लीत क्रिकेट खेळल्यासारखे पार पडले.

Symposium च्या निमित्ताने गाडगीळ सरांचा अगदी जवळून परिचय झाला, व नगरकर वाड्याच्या चकराही भरपूर झाल्या. सरांविषयीचा आदर वाढत तर गेलाच, पण नगरकर वाडा, तिथली माणसे, आणि खुद्द उषाताई या सर्वांविषयी कुतुहल, आकर्षण, व आपुलकी वाढत गेली. नगरकर वाड्यात दरवेळी इतकी माणसे दिसायची की त्यातली भेटायला आलेली कुठली, तिथे नेहमी राहाणारी कुठली, आणि तात्पुरती राहायला आलेली कुठली याचा मला जाम पत्ता लागायचा नाही. असे वाटायचे की तिथे सर्वांनाच खुलेआम प्रवेश आहे आणि सर्वच जण त्यामुळे खुशीत दिसायचे. यामागे गाडगीळ सरांचे प्रभावी, तेजस्वी व्यक्तिमत्व व उदार स्वभाव कारणीभूत तर होताच. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे उषाताईंचा प्रेमळ व निर्मळ, मनमोकळा स्वभाव लोकांना आकर्षून घ्यायचा हे माझ्या हळूहळू ध्यानात येऊ लागले. वर म्हटल्याप्रमाणे वाड्यात अनेक व्यक्ती दिसायच्या आणि कुणाचे कोण आहे हे सुरूवातीला माहित नसल्यामुळे माझा जाम गोंधळ व्हायचा. मावशी, काकू, ताई, काका, तात्या यातले कुठले संबोधन वापरायचे हे काही उमगायचे नाही. या सुरूवातीच्या काळात एकदा उषाताईंना मी "गाडगीळ काकू" असे संबोधले. तर त्या आधी खळखळून हसल्या व म्हणाल्या, "बाप रे, गाडगीळ काकू? असे काही म्हणू नकोस. नुसते उषाताई म्हटलेस तरी चालेल!"

नंतर मला नगरकर वाड्याचे व्यसनच लागले. पुण्यात आल्यावर बरेच लोक त्यांच्या ठराविक ठिकाणांना आवर्जून भेट देतातच. जसे की, वैशाली, शनिवार वाडा, पर्वती, इत्यादी. तसे माझ्या यादीत नगरकर वाडा हे स्थळ कायमचे येऊन बसले. माझे नगरकर वाड्याचे ज्ञान जसे वृद्धिंगत होत गेले तसे मला तिथल्या इतर महत्त्वाच्या व्यक्तींची -- जसे की मालूताई, रोहिणी यांची -- ओळख व मैत्री होत गेली आणि त्यामुळे नगरकर वाड्याविषयी वाटणारी आपुलकी अजूनच वाढत गेली. पुढे माझा स्वतःचा संसार सुरू झाल्यावर माझी पत्नी तनुजा व मुले यांना मी आवर्जून वाड्यावर घेऊन गेलो.

प्रत्येक भेटीत सरांबरोबर आधी एक बौद्धिक व्हायचे. विविध विषयांवर. ते झाल्यावर आपण किती अज्ञानी आहोत आणि "इंजिनियर" म्हणवून घ्यायच्या लायकीचे कसे नाही आहोत याचा पुनःप्रत्यय यायचा. अशा त्या विमनस्क स्थितीत आम्ही बसलेले असताना उषाताई बाहेर येऊन त्यांच्या खुमासदार शैलीत विचारपूस करायच्या, सोपे प्रश्न विचारायच्या. की मग आमचे अज्ञानाचे ढग निवळायचे, आत्मविश्वास पुन्हा जागृत व्हायचा, व आम्ही खुशीत उषाताईंनी केलेले विविध पदार्थ -- ज्यांची नावेही कधी कधी नव्यानेच ऐकायला मिळायची -- आनंदाने प्राशन करायचो. रोहिणीबरोबर जपानविषयी गप्पा व्हायच्या. सरांचे घरातले किंवा वेळणेश्वरमधील प्रोजेक्ट यांवर चर्चा व्हायची. आम्ही विद्यार्थी लोक अर्थातच माना डोलवत कौतुकाने ते ऐकायचो. माझ्या मते उषाताई या एकट्या अशा होत्या की ज्या त्यांचे मत प्रांजळपणे व्यक्त करायच्या. "काहीतरी वेडेपणा, झालं" अशी त्यांची टोकाची प्रतिक्रियाही एकदा ऐकून मी अचंबित झाल्याचे आठवतेय. खुद्द माझेही धाडस पुढे-पुढे इतके वाढले -- अर्थात सरांच्या व उषाताईंच्या प्रेमळ स्वभावामुळे -- की मी वाड्यात गेल्यावर किचन, दिवाणखाना, सरांचे ऑफीस, वाड्याच्या मागचा परिसर, असा कुठेही मुक्तसंचार करू लागलो.

चार-पाच वर्षांपूर्वी -- नक्की कुठल्या वर्षी ते आता आठवत नाही -- उषाताईंनी अमेरिका प्रवास केला व त्यानिमित्ताने त्यांचे Seattle ला येणे झाले. मी स्वतः त्यावेळी भारतात असल्याने त्यांचा पाहुणचार करू शकलो नाही. पण सुदैवाने तनुजा इथे होती व त्या दोघींची भेट झाली. त्या भेटीचे चैतन्य अजूनही ताजे वाटते असे तनुजा पुनःपुन्हा म्हणते.

उषाताई अस्सल पुणेकर. पण पुणेरी अजिबात नाही. त्यांच्या स्वभावात अनेक गुणांचे रहस्यमय मिश्रण होते. मुळात त्यांचा पिंड आनंदी व प्रसन्न. मी तरी त्यांना कधीच गुमसुम, अंतर्मुख, चेहरा लांब करून बसलेले पाहिले नाही. त्यांची प्रसन्नता समोरच्या व्यक्तीलाही त्याचे दुःख, कटकटी विसरायला लावणारी. दुसरे म्हणजे त्या अतिशय उद्यमशील, active. काहीना-काही पाककलेतले प्रयोग किंवा अन्य काहीतरी उद्योग करण्यात त्या कायम व्यग्र दिसायच्या. पण असे करताना त्यात काही बडेजाव नाही, "उद्योजकते"चा आव नाही. नगरकर वाड्यात साधेपणा होता पण सौंदर्यही होते. भरपूर जागा होती, पण घराचे cozy feeling ही होते. वाड्यात सर्वांना मुक्त प्रवेश होता, पण म्हणून "आओ जाओ घर तुम्हारा" असा सावळा-गोंधळ किंवा बेशिस्त अजिबात नव्हती. नगरकर वाड्यावर माझे love at first sight असे प्रेम बसले. आणि ते अप्रुप मला अजूनही आहे. याचे सर्वात मोठे श्रेय उषाताईंना द्यावे लागेल.

२८ मे २०१९ रोजी उषाताई अगदी अचानक स्वर्गवासी झाल्या. अल्पसा आजार इतकेच कारण म्हणता येईल. हा धक्का इतका अकल्पित आणि असह्य आहे की अजून खरेच वाटत नाही. विश्वासच बसत नाही. असे वाटते की नगरकर वाड्यात गेल्यावर पुन्हा एकदा "अरे तू केव्हा आलास? हो बरोबर आहे. तुम्ही अमेरिकेचे लोक याच सिझनला येता नाही का!" असे उषाताईंचे आनंदी आवाजातले उद्गार कानावर पडतील. आणि मग मी झोपाळ्यावर बसून मंद झोके घेत असताना आतून गप्पा मारत उषाताई काहीतरी खाऊ प्लेटमधे भरतील व बाहेर घेऊन येतील आणि गाडगीळ सर घेत असलेल्या बौद्धिकातून थोडावेळ का असेना माझी सुटका करतील!

-- अभय जोशी. ३ जून २०१९